# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधिक्षक
दिनांक ०१.१०.२०१७

## देसाईगंज येथे मटका जुगार रेड
## ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त आरोपी अटकेत

मा. पोलीस अधिक्षक यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु विक्री, जुगार, मटका, सट्टा अशा प्रकारचे बेकायदेशिर व्यवसाय करणा-या व्यावसायिकांवर आळा घालण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखा येथील अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी सोपविण्यात आली आहे. स्थानिक गुन्हे शाखेमधील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना गोपनिय सुत्राकडुन विश्वसनियरित्या माहिती मिळाली कि, मौजा वडसा (देसाईगंज) येथील स्थानिक मटका जुगार चालविणारे नामे बसंतकुमार नागदेवे, सतिश अग्रवाल हे त्याचे स्वत:चे मालकिचे राहाते घरी तसेच शबुद्दिन पठान हा देसाईगंज येथील आठवडी बाजारात मटका जुगाराचा डाव मांडुन स्वत: तसेच इतर एजंटाच्या मार्फतीने लोकांकडुन पैसे घेवुन त्यांना मटका जुगाराचे आकडे लिहुन देवुन त्यावर हारजितचा डाव मांडला असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीच्या आधारे मौजा वडसा (देसाईगंज) येथे मटका जुगार रेड संबधाने कायदेशिर कारवाई करण्यासंबधात मा. डॉ. अभिनव देशमुख पोलीस अधिक्षक गडचिरोली तसेच मा. महेंद्र पंडीत, अपर पोलीस अधिक्षक गडचिरोली यांचे मार्गदर्शनाखाली मटका जुगार रेड करीता पोलीस निरीक्षक स्थागुशा प्रदिप लांडे, खुशाल गेडाम, दादाजी करकाडे , हे सोबतचे पोलीस पथकामधील भाऊराव बोरकर, नरेश सहारे, कान्हुजी गुरनले, प्रेमकुमार दुर्गे, प्रमोद वाळके, हेमंत गेडाम, चंदु मोहुर्ले, प्रशांत पातकमवार, प्रदिप चवरे, वृशाली चव्हाण, दुर्गा साखरे, वैशाली चव्हाण, फोटोग्राफर देवा पिदुरकर, संतोष नादरगे, अशा प्रकारे पोलीस पथक तयार करुन योग्य प्रकारे सापळा रचुन मौजा देसाईगंज येथील बसंतकुमार उर्फ बसु फत्तुमल नागदेवे याचे अधिपत्याखाली मटका जुगार चालु असलेल्या ठिकाणी रेड केली असता, त्या ठिकाणी विजय विसराम खोब्रागडे रा. देसाईगंज, राजेश श्रीहरी करंडे रा. हनुमान वार्ड देसाईगंज, नरेश श्रीहरी करंडे, हनुमान वार्ड देसाईगंज, अरुण पांडुरंग घोनमोडे रा. आमगाव, रविंद्र रामभाऊ नैताम देसाईगंज हे लोकांकडुन मटका जुगाराचे डावाकरीता पैसे घेत असतांना मिळुन आले. यातील इसमाचे ताब्यात रोख रक्कम ४६२०/- व जुगाराचे डावातील साहित्य असे एकुन ९१४५/- रुपये जप्ती केले.

नामे सतिश रामुलाल अग्रवाल याचे अधिपत्याखाली मटका जुगार चालु असलेल्या ठिकाणी रेड केली असता, त्या ठिकाणी प्रशांत नारायण बनसोड रा. कोकडी, प्रकाश वातु शेंडे रा. सावंगी, प्रविण गुलाब पुरी रा. भगतसिंग वार्ड देसाईगंज, रेशीम प्रभाकर झिलपे रा. शिवराजपुर, हे लोकांकडुन मटका जुगाराचे डावाकरीता पैसे घेत असतांना मिळुन आले यातील इसमाचे ताब्यात रोख रक्कम २१,१००/- व जुगाराचे डावातील साहित्य असे एकुण २६,३२०/- रुपयाचा माल जप्ती केले.

नामे शाबुद्दिन पठाण रा. देसाईगंज हा याचे अधिपत्याखाली आठवडी बाजरात सार्वजनीक ठिकाणी मटका जुगार चालु असलेल्या ठिकाणी रेड केली असता, त्या ठिकाणी देवाजी रामजी गोंडाणे रा. तुळशी, चंदु किसन सुर्यवंशी रा. शिवराजपुर, लिलाधर गणपत लोणारे रा. तुळशी, यशवंत मोतीराम बन्सोड रा. तुळशी, रंजित बारीकराम बोदेले रा. जुनी वडसा हे लोकांकडुन मटका जुगाराचे डावाकरीता पैसे घेत असतांना मिळुन आले. यातील इसमाचे ताब्यात रोख रक्कम २१,७३०/- व जुगाराचे डावातील साहित्य असे एकुन २२,९६३/- रुपयाचा माल जप्ती केले. मटका जुगाराचा डावा मांडतांना मिळुन आलेल्या इसमां विरुध्द पोलीस स्टेशन देसाईगंज येथे महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियमान्वये वेगवेगळे स्वतंत्र गुन्हे नोंद करुन कायदेशिर कारवाई करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखेकडुन झालेल्या कारवाई मुळे गडचिरोली जिल्हयातील अवैध मटका जुगार चालविणा-या लोकांवर अंकुश बसला असुन त्यांचे धाबे दणालेले आहेत.



